माझा मराठाचि बोलु कौतुके

# ज्योती

नरी अमृतातेंही पैजा जिंके ।

*******************************************************************************

ईशान्य ओहायो मराठी मंडळ ऑक्टोबर २०१७ NEOMM Tax ID: 341644989

*******************************************************************************

## रिकामे घरटे

म्हणु नको सखे
घरटे माझे रिते
आम्ही दोघे अजून
राहतो म्हटल इथे

उडून गेली पिल्ले
आपापल्या दिशांना
शोधत बसु दोघे
आता एकमेकां

करीन म्हणते जरा
स्वत:ची डागडुजी
केसांना पर्म नवा
रंगवीन नखे हलकीशी

बघिन म्हणते आता
देश नवे नवे
क्रुझवरती जाऊ
राजाराणी दोघे

शिकेन म्हणते आता
भाषा एक नवीन
गोल्फ किंवा स्केटिंग
क्लासेसना जाईन

किती नवे छंद
वेळ भरला पुरा
खरे सांगु सखे
ऊर तसाच रिता

असेच कधीतरी
स्नेह्यांच्या मेळ्यात
सगळे काही असून
मन मात्र उदास

हाक येते कानी
आई म्हणते कुणी
डोळ्यामधे दाटतात
पिल्लांच्या आठवणी

Rajanee Shendure 2000



# तुझी माझी जोडी जमली गं .....!!

नमस्कार वाचकहो,

दिवाळी अंकाच्या निमित्ताने तुम्हा सर्वांशी मला संवाद साधण्याची संधी मिळाली त्याबद्दल "ईशान्य ओहायो मराठी मंडळाचे" विशेष आभार !!

ह्या लेखाच्या माध्यमातून जो विषय मी मांडणारं आहे तो सर्वांच्याच परिचयाचा, अत्यंत जवळचा आणि उत्सुकतेचा आहे. प्रत्येकाला कायम आयुष्यात पुढे काय घडणार आहे, चांगले कि वाईट याची उत्सुकता असते. भविष्यात घडणाऱ्या गोष्टी आधीच जाणून घेता येतील का असे वाटत असते. होय, बरोबर ओळखलंत, मी ज्योतिष ह्या विषयाबद्दलच बोलतेय !!

ज्योतिष हे शास्त्र, ज्ञान, कला की फकत एक भाकडकल्पना असा प्रश्न अनेकांना पडतो. माझ्याही मनात काही वेगळे नव्हते. या विषयाबद्दलची उत्सुकता कायम होती. आजतागायत जे ज्योतिषी भेटले होते त्यांनी कधी चांगले, कधी वाईटाा, कधी अगदी असंबद्ध तर कधी अगदी नेमके असे मार्गदर्शन केले, आपण सर्वांनाही असे अनुभव नक्कीच आले असतील. पण त्यामुळे या शास्त्रावर विश्वास ठेवावा कि ठेवू नये हे कळत नव्हते.

काही वर्षांपूर्वी मात्र हे शास्त्र शिकण्याचा योग माझ्या आयुष्यात आला. होय योगच, कारण कुंडलीत योग असल्याशिवाय काहीही घडून येत नाही. सुरुवाती च्या काळात ज्या शास्त्रावर विश्वास ठेवावा कि ना ठेवावा ह्या मताची मी हळूहळू ज्योतिष शास्त्राचे बारकावे अभ्यासू लागले. या विश्वातील विशाल ग्रहांचा आणि आपला कसा संबंध आहे, आपला जन्म, शिक्षण, नोकरी-धंदा, विवाह, अपत्य, आपल्या आवडी-निवडी, आपली मते, आपली मनस्थिती, आरोग्य ह्या सगळ्यावर कसा प्रभाव आहे हे जाणून घेतल्यावर, आपण या विश्वातील एक अतिशय किरकोळ नग्रगण्य अस एक जीव आहोत असे वाटून जाते.

ज्योतिष शास्त्र हे केवळ कुंडलीशी सीमीत नाही तर त्याचे अनेक भाग आहेत जसे फलज्योतिष, हस्तसामुद्रिक, वास्तुशास्त्र, लोलकशास्त्र, रमलविद्या वगैरे. आपल्या देशात पुरातून काळापासून अस्तित्वात असलेल्या या शास्त्राला आज पाश्चात्यांनी देखील मान्यता दिली आहे.

आज जगप्रसिद्ध असलेल्या 'किरो' नामक ज्योतिषी बद्दल ऐकून तुम्हाला नवल वाटेल. किरो ज्याचे खरे नाव "Willaim John Warner" याला काही लोक Count Louis Hamon म्हणून देखील ओळखतात. या आयरिश ज्योतिषीने १८८० च्या आसपास हिंदुस्थानात फक्त हे शास्त्र शिकण्या करता प्रवेश केला. वयाच्या १७-१८ व्या वर्षी तो भारतात आला. मुंबई बंदरावर बोटीने उतरला. जवळ जवळ २ वर्ष तो कोकणात काही तज्ज्ञ गुरुं कडून ज्योतिष शास्त्राचे शिक्षण घेत होता. कोकणातील जोशी समाजाकडे त्या वेळेस ज्योतिष शास्त्रातील काही महत्वपूर्ण असे हस्तलिखित होते, ज्याचा

किरो ने अभ्यास केला. खास करून हस्तसामुद्रिक या विषयाचा त्याने खोलात अभ्यास केला. पुढे याच किरो ने हस्तसामुद्रिक, ज्योतिष, अंकशास्त्र या विषयावर अनेक पुस्तके लिहिली.

Eg. Cheiro’s Palmistry for All, Cheiro’s Book of World Predictions, Cheiro’s book of Numbers etc.

त्याची अनेक पुस्तकं आज मार्गदर्शनपर अभ्यासली जातात.

सांगायचा मुद्दा असा की हे ज्ञान म्हणजे एक अथांग सागर आहे आणि शिकणारा एक नाविक जो लाटांच्या हिंदोळ्यावर झुलत झुलत एका किनाऱ्यापासून दुसऱ्या किनाऱ्या पर्यंत पोचतो खरा पण अजून असे अनेक किनार गाठायचे बाकी असतात!!

ज्योतिष शास्त्राशी सगळ्यात जास्त संबंध कोणत्याही सामान्य माणसाचा येतो तो खर तर विवाह जमताना किंवा जमवताना. बरं विवाह जमवताना कुंडली पाहणे का एवढे महत्वाचे आणि आपण कुंडली मेलन नाही केले तरी गुण मेलं तरी करतोच, प्रेम विवाह मध्ये देखील त्यांचे आई वडील गुण मेलं करण्या करता ज्योतिषा कडे धाव घेतात. त्यामुळे एक गोष्ट मात्र कळून येते कि वरवर ज्योतिष वगैरे वर विश्वास न ठेवणारी मंडळी देखील काही ठराविक प्रमाणात या शास्त्रावर अवलंबून आहेत किंवा त्याला प्रमाणपात्र मानतात.

३६ गुण जुळले आणि लग्न झाले तरिही नवरा-बायको ची तक्रार असते कि कसे काय आमचे गुण जुळले कोणास ठाऊक, आम्हा दोघांचा स्वभाव तर अगदी विरुद्ध आहे, अगदी दोन विरुद्ध दिशा आहोत!! पण गम्मत अशी आहे मंडळी मुळात कुंडली मध्येच नवरा-बायको यांचे स्थान हे परस्पर विरुद्ध दिशेला दाखवले आहे. कुंडली मधील पहिले स्थान हे जातकाचे असते तर त्याच्या अगदी विरुद्ध बाजूला समोरचे सातवे स्थान हे जोडीदाराचे असते. दोन परस्पर विरुद्ध दिशा (पूर्व आणि पश्चिम) आहेत त्या. पण संसारात त्याचीच गरज असते, धन आणि ऋण एकत्र यावेच लागतात !

आयुष्यात कोणतीही घटना घडण्या करता एक योग्य वेळ यावी लागते ज्याला आपण 'योग' असे म्हणतो. लग्न जमण्याचा हि योग यावा लागतो. हा योग म्हणजे तरी नक्की काय? म्हणजे बघा दोन अनोळखी व्यक्ती किंवा प्रेम विवाह मध्ये ओळखीच्या व्यक्ती, दोघांच्या कुंडली मध्ये एकाच वेळेस अशी सम/सारखी परिस्थिती निर्माण व्हावी लागते ज्यामुळे विवाह घडून येतो.

आता ही परिस्थिती कशी व कशामुळे निर्माण होते ते पाहूया.

मुळात एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत विवाहाचा योग असावा लागतो. बरं तेवढंच पुरेसं नाही तर ग्रहांच्या दशा देखील तश्या याव्या लागतात. बरं नुसतीच योग्य ग्रहांची दशा येऊन चालत नाही तर त्या वेळेची गोचर ग्रहांची स्थिती लाभकारक असावी लागते. हे कुठल्याही विषयाला लागू आहे फक्त विवाहच नाही तर जन्म, नोकरी, शिक्षण सगळ्यालाच लागू आहे. जेव्हा अशी परिस्थिती निर्माण होते त्याच वेळेस ते कार्य घडून येते.

बरेचदा आपण बघतो कि एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व खूप आकर्षक आहे, शिक्षण खुप चांगले आहे, नोकरी चांगली आहे तरी लग्न काही अजून जमत नाही पण मग एवढं सगळं असून देखील माशी शिंकते कुठे? याला एकच उत्तर आहे असे नाही तर कुंडलीच्या दृष्टिकोनातून पाहिले तर अनेक कारणे आहेत.

विवाह होण्याकरता कुंडलीत लग्नाला कारक जे ग्रह आहेत ते शुभ स्थानात, शुभ ग्रहांबरोबर आणि शुभ ग्रहांच्या दृष्टीत असावे लागतात. उदाहरणार्थ, लग्नाला कारक ग्रह म्हणजे पुरुष कुंडली मध्ये शुक्र, चंद्र, गुरु तर स्त्री कुंडली मध्ये शुक्र, रवी, मंगल हे कुंडली मध्ये शुभस्थित आहेत का हे पहिले पाहावे लागते. म्हणजे बघा कुंडलीची एकूण १२ स्थाने आहेत त्यापैकी काही शुभ तर काही अशुभ आहेत. १, ५, ९, ११ आणि ७ (जोडीदाराचे स्थान) स्थाने शुभ मानली जातात. या स्थानांमध्ये हे विवाह कारक ग्रह असावेत तसेच त्यावर शुभ ग्रहांची दृष्टी असावी, या ग्रहांचे आपापसातील योग देखील शुभ असावेत (लाभ योग, नवपंचम योग वगैरे)

पुरुषाच्या कुंडली मध्ये शुक्र चंद्र यांचे स्थान पाहणे महत्वाचे आहे कारण हे दोन्ही ग्रह स्त्री कारक आहेत. त्याच प्रमाणे स्त्री कुंडली मध्ये रवी आणि मंगळ हे ग्रह महत्वाचे ठरतात कारण ते पुरुषकारक ग्रह आहेत. काही ग्रह हे नपुंसक मानले जातात बुध आणि शनी, या दोन्ही ग्रहांचे स्थान व त्यांचे परस्पर योग पाहणे विवाहाच्या दृष्टीने महत्वाचे असते.

जर एखाद्या पुरुषाच्या कुंडलीत चंद्रासोबत राहू किंवा शनी असे अशुभ ग्रह एकाच स्थानात असतील (युती योग) तर हमखास त्या व्यक्तीचा जोडीदार एकतर अतिशय विचीत्र असतो किंवा कोत्या मनोवृत्तीचा असतो. शनी हा कोणत्याही गोष्टीत विलंब करणारा ग्रह आहे तो जर सप्तम स्थानात असेल तर एकतर विवाहास विलंब होतो किंवा जोडीदार वयाने मोठा किंवा विजोड असतो.

विवाहासाठी कुंडली जुळवताना पुरुष व स्त्री या दोघांचे केवळ गुण जुळणे महत्वाचे नसते तर त्या दोघांच्या कुंडल्या एकमेकांना पूरक असणे देखील महत्वाचे असते. दोन्ही कुंडल्यांमध्ये एकंदर विवाह सौख्य व संतती योग पाहणे हि महत्वाचे असते. दोघांमध्ये शारीरिक तसेच मानसिक दोष नाहीत ना हे पाहावे लागते. दोघांच्या राशी, नक्षत्र, व चरण एक असता कामा नयेत. तसेच त्यांच्या राशींमध्ये द्विराश्यांतर योग नसावा म्हणजे दोघांच्या राशींमध्ये २ पेक्षा जास्त राशींचे अंतर असावे. हे का पाहावे तर असे अंतर नसेल तर दोघांना एकाच वेळेस किंवा लागोपाठ साडेसाती येते ज्यामुळे संसारात उगाच सतत विघ्न येऊ शकतात. हे सर्व जाणून घेण्यासाठी खरंच एखाद्या तज्ज्ञ ज्योतिषी कडे कुंडली दाखवावी उगाच इथे तिथे कोणाला दाखवू नये आणि दहा ज्योतिषीं कडे तर मुळीच दाखवू नये त्यामुळे गोंधळ वाढतो.

योग्य व्यक्तीच्या हातात कुंडली जाणे महत्वाचे असते, का तर जेव्हा कुंडली मध्ये काही दोष असतात जसे मंगळ दोष किंवा कालसर्प योग तेव्हा योग्य मार्गदर्शनाची गरज असते. बरेचदा काही ज्योतिषींना या दोषांचे पूर्ण ज्ञान नसते व त्याचे निवारण कसे करावे हे देखील ज्ञात नसते. मग अशावेळी कुंडली मध्ये मंगळ दोष किंवा कालसर्प योग नसतानाही तो दोष आहे असे सांगून मोकळे होतात.

बरेचदा असा समाज करून दिला जातो कि मंगळ दोषाच्या कुंडली असलेल्या जातकाचा तसाच दोष असणाऱ्या व्यक्तीशी विवाह करावा. पण ते देखील तेवढेसे खरे नाही. उलट एका कुंडलीत मंगळ बलवान असेल आणि दुसऱ्या कुंडलीत शनी बलवान असेल तरी विवाह करण्यास काही हरकत नाही. म्हणजे एक उग्र तर एक शांत. एक उथळ तर दुसरा अतिशय संथ आणि समजूतदार. यामुळे संसारात एक प्रकारे समतोलच निर्माण होईल. कुंडलीत मंगळ बलवान असणे हा दोष म्हणता येणार नाही, तो इतर पापग्रहांमुळे बिघडला असता दोष म्हणता येईल. खासकरून स्त्रियांच्या कुंडलीत मंगळ बलवान असणे चांगलेच, मंगळामुळे मिळणार तडफदारपणा, ताकद, धैर्य, निडरपणा या सगळ्याची आज मुलींना गरजच आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात कर्तबगारी दाखवताना हा मंगळ त्यांना पूरकच ठरेल.

त्याच प्रमाणे कालसर्प योगासाठी कोणतीही विधी करण्यापूर्वी खरोखरच कुंडली मध्ये हा योग आहे का हे पडताळून पाहावे. जेव्हा सर्व ग्रह राहू व केतू ह्या दोन ग्रहांच्या मध्ये येतात तेव्हा त्याला कालसर्प योग मानले जाते. राहू म्हणजे सर्पाचे मुख तर केतू म्हणजे त्या सर्पाची शेपूट आहे. जणू काही सर्व ग्रह या सर्पाने गिळंकृत केल्याप्रमाणे भासतात. असे असल्यासच हे विधी करून घ्यावेत. कधी कधी एखादा ग्रह राहू-केतू च्या कचाट्यांतून बाहेर पडलेला दिसतो त्यास काही ज्योतिषी अर्धकालसर्प योग असेही म्हणतात.

जेव्हा कुंडली जमेल व विवाह निश्चित होईल त्यानंतर मुहूर्त काढताना देखील थोडी सावधानी बाळगावी. बरेचदा मुहूर्त काढणारे गुरुजी देखील त्यांच्या सोईप्रमाणे आणि हॉल च्या उप्लब्धतेप्रमाणे मुहूर्त काढतात. त्यामुळे कधी कधी चुकीच्या व लाभदायक नसलेल्या घडीवर विवाह संपन्न होतात. म्हणजे कसं असतं, ज्या वेळेचा मुहूर्त काढला जातो त्या वेळेस अवकाशात ग्रहांची एक ठराविक स्थिती असते (गोचर). पूर्व दिशेस त्या वेळेस ज्या राशीचा उदय होत असतो त्यास ज्योतिष शास्त्रात 'लग्न 'असे म्हणतात. त्यावेळेस कोणते लग्न आहे हे पाहणे महत्वाचे असते. हे लग्न शुभ राशींचे म्हणजे ज्यांचे राशी स्वामी हे शुभ ग्रह (गुरु, चंद्र, शुक्र) आहेत अश्या राशींचे असावे. हे राशी स्वामी देखील त्या वेळी शुभ स्थानात असावेत (१, ५, ९, ११).

लग्न स्थानात व सप्तम स्थानात (जातकाचे व जोडीदाराचे स्थान) अशुभ ग्रह असता कामा नयेत, उदा. शनी, मंगळ, राहू, हर्षल किंवा त्यांच्या दृष्टी लग्न किंवा सप्तम स्थानावर असता कामा नयेत. ही दोन्ही स्थाने दूषित होता कामा नयेत. हल्ली लग्नामध्ये जरी मुहूर्त बरोबर काढला असला तरी कधी कधी तो मुहूर्त टळून जातो तरी विवाहाच्या विधी काही पार पडत नाहीत, भलत्याच मुहूर्तावर शुभमंगल घडताना दिसते. बरेचदा हे आपल्या हातातही नसते पण जाणीवपूर्वक प्रयत्न केला तर आपण हे टाळू शकतो.

म्हणूनच ज्योतिष शास्त्राचे मार्गदर्शन घ्यावे, योग्य व्यक्ती कडून घ्यावे. त्यात काहीच चुकीचे नाही. अर्थात ज्योतिष वगैरे च्या मागे वाहवत जाऊ नये. कारण ह्या सगळ्याच्या वर देखील काही अनाकलनीय गूढ शक्ती आहेत ज्या तुम्हा आम्हाला ज्ञात होणे कठीण आहेत.


वेळ प्रसंगी ज्योतिश्याचा सल्ला घ्या पण निर्णय मात्र स्वतः घ्या, आणि हो ज्योतिष्याने दिलेला सल्ला जर उपयुक्त ठरला तर ते त्या ज्योतिष्याला मात्र नक्की कळवा. कारण तुमचे अनुभव आणि अनुभूती हे या शास्त्राला आणि ज्योतिषींच्या अभ्यासाला नक्कीच अजून दृढ करेल.

माझ्याकडून तुम्हा सर्वांना दिवाळीच्या व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!

धन्यवाद !!

## गार्गी आचरेकर

**(ज्योतिष विशारद, वास्तू विशारद, हस्तसामुद्रिक विशारद)**



# शनी ची साडेसाती

शनी ची साडेसाती म्हटली कि सर्व साधारण पणे लोकांना भीती वाटते आणि का वाटू नये? साडेसातीत राजा विक्रम वर चोरीचा आळ आला. तेलाच्या घाण्या वर काम करावे लागले. गुरु माउली ला सुळा पर्यंत नेऊन परत आणले. रामराजाला वनवास घडविला. रावणाचा समूळ नाश केला. असे हे महाप्रतापी शनी महाराज. याउपर आपले मित्र मैत्रिणी, नातेवाईक यांच्या कडून साडेसातीच्या काळात आलेल्या आपत्ती ऐकलेल्या असतात. त्यामुळे साडेसाती म्हटली कि कापरे भरणे स्वाभाविकच. तशातच बऱ्याचशा कुडमुड्या ज्योतिषांचा लोकांना घाबरविण्यासाठीचा हा परवलीचा शब्द आहे म्हणूनच आज आपण शनी महाराज आणि त्यांची साडेसाती समजून घेऊया.

शनी महाराजांकडे रवीसारखे राजसत्ता चालविण्याचे गुण नाहीत, चंद्राचे कोमल मातृ हृदय नाही, मंगळाचा धाडस आणि पराक्रम नाही, शुक्राचे सौंदर्य नाही. शनी महाराज प्रामाणिक, एकनिष्ठ व कामसू वृत्तीचे आहेत. मनुष्य प्राणी किती पाप-पुण्य करतो त्याची नोंद घेऊन त्याची फळे देणारे निष्ठुर न्यायाधीश आहेत.

जेव्हा सर्व काही छान चाललेले असते तेव्हा आपण नसत्या कुचाळक्या करून गरज नसताना दुसऱ्याला खाली पडतो. काही कारण नसताना ऑफिस पॉलिटिक्स मध्ये एखाद्याचे नुकसान करतो, इगो आणि अहंकाराने उन्मत्त होतो तेव्हा शनी महाराज त्याची शांतपणे नोंद घेत असतात. त्यानंतर जेव्हा साडेसातीचा फेरा येतो आणि आपण जॉब लॉस, नसती आजारपणे, घराच्या कटकटी याने वैतागून साडेसातीच्या नावाने बोटे मोडतो तेव्हा दोष त्या साडेसाती चा नसतो. मूळ कारण हि आपली पूर्व कर्मे असतात.

साडेसातीत सर्वांना अशा कटकटींना सामोरे जावे लागते का? सर्वांचीच अशी धूळदाण उडते का? तर उत्तर नाही असेच आहे. विश्वास ठेवा आगर ठेवू नका, पण साडेसातीत भरभराट झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. आपल्या मित्र मैत्रिणी पैकी कित्येक जण मायभूमी सोडून इकडे सात समुद्रापार साडेसाती मध्येच आले असतील.

साडेसातीत ज्यांना त्रास होतो त्यातल्या कित्येकांना स्वतः ची नव्याने ओळख होते. जमिनी पासून चार बोटे वर गेलेले पाय परत जमिनीवर येतात. "मी म्हणजे कोणीतरी खास' हा अहंकार धुळीस मिळतो. बरेचसे जातक, सोने जसे आगीतून गेल्यावर अजूनच चमकू लागते तसे त्यांचे व्यक्तिमत्व चमकू लागते.

असो, तर आता हि साडेसाती म्हणजे काय ते समजावून घेऊ.

शनी हा अतिशय संथ गतीने प्रवास करणारा ग्रह आहे. रवीपासून शनीचे अंतर ८७ कोटी २० लक्ष मैल आहे. शनी ला बारा राशी मधून प्रवास करण्यास अदमासे ३० वर्षे लागतात. म्हणजेच प्रत्येक राशीत शनीचे वास्तव्य हे २.५ वर्षे असते. जातकाचा जन्मस्थ चंद्र ज्या राशीत असतो त्याला जातकाची जन्म रास म्हणतात. ह्या जन्म राशीच्या अगोदरच्या राशीत शनी जेव्हा प्रवेश करतो तेव्हा जातकाची साडेसाती सुरु होते. जन्मस्थ चंद्राच्या पुढील राशीतून निघून तो त्यापुढे जातो तेव्हा साडेसाती संपते. अशा तऱ्हेने जन्मस्थ चंद्र राशी अगोदरची एक रास, जन्म रास व नंतरची एक रास या तीन राशीन मधून शनीच्या भ्रमणाला जी साडे सात वर्षे लागतात त्याला शनी ची साडेसाती असे म्हणतात.

याबरोबरच, शनी जेव्हा जन्म राशीला किंवा लग्नाला चौथा येतो तेव्हा त्याला कंटक शनी असे म्हणतात. त्याच प्रमाणे चंद्राला जेव्हा तो आठवा येतो तेव्हा त्याला छोटी पानोती असे म्हटले जाते. चंद्राप्रमाणेच शनी हा जन्मस्थ मंगळ, रवी इत्यादी ग्रहांवरून भ्रमण करतो तेव्हा हि साडेसाती सारखेच परिणाम देऊ शकतो. मात्र ते त्या ग्रहांची स्थिती, त्यांची शनीबरोबरचे योग्य इत्यादी वर सुध्दा अवलंबून असते. यासंबंधी नंतर कधीतरी.

आता अशा या निष्ठुर न्यायाधीशाचे काम करणाऱ्या शनी देवांच्या साडेसाती मधून सुटका कशी करून घ्यावी ते पाहू.

शनी महाराजांना ढोंगीपणा, इगो, अहंकार, निरोद्योगीपणा अजिबात आवडत नाही. शनीच्या अमलाखाली समाजातील अतिशय खालच्या दर्जाची समजली जाणारी गोर गरीब जनता, अपंग, वृद्ध असे सर्व येतात. यांना मदत केल्यास शनी महाराज खुश असतात. याचप्रमाणे महादेव हे शनीचे दैवत आहे तर मारुतीरायांचा शनिदेव आदर करतात. त्यामुळे महादेव व मारुतीराया यांची भक्ती केल्यास शनिदेव त्रास देत नाहीत. शनिदेवाला तेल आवडते. त्यातल्या त्यात तीळ व राई चे तेल उत्तम. त्यामुळे शनिदेवाला हे तेल वाहणे, किंवा ह्या तेलाचे दान करणे. उडीद वाहणे इत्यादी उपायांनी शनिदेवाचा संभाव्य त्रास कमी होतो.

असे हे त्राही भगवान करून सोडणारे शनिदेव ज्याच्यावर कृपा करतात त्याला कुबेराची संपत्ती देतात. अमिताभ बच्चन, O. P. नय्यर, बाळासाहेब ठाकरे असे कित्येक महान लोक त्यांच्या शनी महादाशेच्या काळात त्यांच्या महानतेला पोहोचले.

(शनी महादशे वर विस्ताराने नंतर कधीतरी). अनेक कारखानदार, राजकारणी, अति श्रीमंत लोकांच्या पत्रिकेत हमखास पणे शुभ शनी बलशाली आढळतो. तसेच ह्या शनीचा धन स्थानाशी व धनेशाशी संबंध सापडतो.

शनी महाराजां बद्दल थोडे अधिक सांगायचे झाल्यास, पश्चिम दिशेवर शनीची सत्ता आहे. ८ हा शनीचा अंक आहे. नीलमणी किंवा ब्लू sapphire हे शनीचे रत्न आहे. शनीला निळसर रंग आवडतो. ज्या ज्या विषयात खोलवर पणा व बुध्धीला खाद्य द्यायला वाव आहे असे किचकट गूढ विषय शनीला आवडतात. शनी कडे चिकाटी, दृढ निश्चय, श्रम कष्ट करण्याची तयारी, उद्योगीपणा, काटकसरी पणा, अभ्यासू वृत्ती, संशोधक वृत्ती, न्यायी पणा आढळतो.

तेव्हा अशा या अहंकाराचा नाश करणाऱ्या, दुर्जनांना धडा शिकविणाऱ्या, देण्यास आल्यास भरभरून देणाऱ्या शनिदेवांना नमस्कार करून हा लेख आवरता घेतो.

**ज्योतिष विशारद शैलेश आचरेकर**



# Athvani Daha Varshan purvichya…




Hi friends, wish you Happy New Year and Happy Christmas!!!
Do you wish to spend your Christmas on any unique island? Then don't wait. Enjoy your new year days in a different way - on very special magical sunny island...Singapore. Recently I had an opportunity to explore the 'Singapore Khajana'. Let me share my experiences about the great journey...

Two years back after my marriage, I came to Pune and I have been working in Girikand Travels as Travel counselor International ticketing. As soon as I got my fresh passport, my husband Abhijit wanted me to visit Singapore with him and insisted that I book the air tickets. Coincidentally, the very next day, I came to know about a special offer by Singapore airlines. On the occasion of 60 years of celebration, Singapore airlines had offered 60% discount only for frontline international ticketing staff along with their spouse.

Being an International Frontline Staff the offer was fortuitous and enabled me to visit Singapore with my husband by availing the **'Singapore Khazana' Offer'.** Our Director Mrs. Shubhada Joshi permitted me to grab this opportunity. Our ticketing manager Mr. Sachin Pardeshi undertook and completed the necessary formalities and arranged my air-tickets on time.

Within four days we had air tickets, visas, foreign exchange, insurance and even hotel bookings arranged for by Girikand. However all things happened so fast, that we had little time left to book a planned tour to visit the various places in Singapore. But we were eager to fly and decided *Jo Hoga so dekha Jayega.*

We took off on 5$^{th}$ September 07 and that was really an exciting morning of my life. We arrived at Singapore airport on time and had a warm welcome with golden carpets laid everywhere. I was really enchanted with the spectacular beauty of Changi airport. After immigration formalities, Abhijit (my husband) suggested that I go to the visitor's center to collect a city map and brochure describing the various places of interest. One chatty Taxi driver dropped us at our hotel "Albert Court" within 20 minutes. Immediately after check in at the hotel, we went out to the area known as "Little India" that was just opposite to the hotel. We found a really nice south Indian restaurant called "Sree Sagar" and had a typical south Indian dinner.

Next morning was full of enthusiasm. We had no tour, taxi or bus booking in advance. But my husband and I were excited to find our own way around.

We selected the places of interest, chose the most suitable ways to visit them and planned our itinerary for the next three days.

The most suitable way we had chosen was MRT. MRT stands for Mass Rapid Transit. Singapore's automated and underground railway. It has three main lines East-West line, North-South line and North-East line in green, red, and purple colors with 27, 27 and 17 stations respectively. We went through the whole map and came to know that MRT network was a convenient, comfortable and quickest way of getting around much of the island nation. We started our tour by learning how to purchase



MRT tickets on an automated machine. Very quickly we became familiar with the system and purchased the tickets to Harbor front. This was the start of our journey to the most popular attraction "Sentosa Island". From Harbor front we had three options i.e. by cable car, by bus and by monorail to cross the sea to reach Sentosa. We had chosen monorail because I liked that cute and tiny train called Sentosa express.

## Wonderland Sentosa

Sentosa is Singapore's premier island resort. Sentosa derived from the Malay word meaning "peace and tranquility". Sentosa is a natural and peaceful island that offers tourists many exciting activities and a cluster of splendid attractions all within walking distances and in a very systematic and organized way.

We reached Sentosa Island and got down at the station "Imbiah Lookout". At Imbiah we first visited the **Images of Singapore** a 3D show "Four winds of Singapore" about four founders of Singapore. As soon as we entered there, a cute small representative invited us in an old warehouse, where 4 still photographs of 4 founders started talking with each other about the agreement. We felt like we were carried back into the past. The show was so fabulous and inexplicable. Then we visited a museum which recounts Singapore's history through life size statues. It was a nice experience to know about rituals, festivals and cultural practices of Chinese, Malays, and Indians in their full glory. Singapore is really one city with three cultures.

After that we visited a gigantic statue of Merlion. A 37-meter tall version of the original half fish-half lion that has a 360-degree panoramic view of Singapore islands and Singapore southern shore. At the time of purchasing the entry tickets we came to know an important thing about the Singapore Airlines Boarding Pass Privilege. You can get discounts of 10 % to 20% on entry ticket for most of the attractions.

Our next station was Beach station with the very popular attraction "Dolphin lagoon" to watch the exciting dolphin show and even touch the sweet pink dolphins. After that we visited the romantic "Siliso beach" where we enjoyed a lot!

We took the Sentosa bus and went for a stunning attraction "Underwater world" to observe the resident fishes (from a see-through tunnel) in their natural environment and "Songs of the sea" (an exciting laser show with water jets, flames and music).

We strolled back to the hotel again by traveling on the monorail and MRT. On the second day we planned to visit the attractions that were comparatively further away. Firstly we reached Jurong east MRT station and took a bus to visit "Singapore Science Center" and "Snow City".

After going through an advanced and innovative world of science we met our natural friends in Jurong Bird Park. For that we traveled up to the last stop of East west MRT Line "Boon Lay". It's a well-known destination with over 9000 birds belonging to 600 species. It is one of the world's best in conservation and display of birds in natural settings. Jurong Bird Park has unique shows like 'Birds and Buddies' and 'Birds of prey' at 10 and 11 in the morning and 3 and 4 pm in the afternoon. Here you will find the world's largest collection of south-east Asian hornbills, world's tallest man-made waterfall and an air-conditioned pano-rail through Thai airways that transports visitors through a spectacular park. While coming back to the hotel we spent some time on Orchard road for shopping. Orchard road used to feature orchards and plantations but today it is Singapore's prime shopping thoroughfare.

On the third day we traveled by Singapore airlines 'Hop on' bus to cover all the attractions within Singapore city. Again we got the advantage of Singapore Airlines Boarding pass. We paid only 3 SGD each for 1 Day unlimited Hop Ons-Hop Offs in an AC bus. It's a very convenient and punctual bus service suitable to explore Singapore city. We had covered Suntec city, Marina Bay, Esplanade mall, Supreme Court, Merlion Park, Raffles statue, Singapore botanical garden and National orchard garden, Singapore River, China town and Orchard road by taking two full circles to the city. We thoroughly enjoyed this experience.

### Duck Tours

This is probably the most unusual way of sightseeing around Singapore. The fun begins once you board 'The Duck' an amphibious American military craft once used in Vietnam War.

...continued on page 6



# Girikand News

## Congratulations!



Our director
Ms Shubhada Joshi
has been re-elected
as Secretary General
of Travel Agents
Association of India
for year 2007-2008.

I on behalf of the staff of the Muslim Co Operative bank, Ltd, Pune, Thank you and the staff of Your tour agency, particularly Mr. Vishwanath, for hospitality and services provided to us during Pune-New Delhi-Agra-New Delhi-Pune, tour. Throughout the tour your services were 1st class in every respect, whether it was at Airport assistance to staff, or at various monuments, we got humble and prompt services. Lodges and Meals provided to us were also best.
In a short span of time you arranged the schedule perfectly.
We are very happy to state that, we are fully satisfied and all credit undoubtedly goes to Girikand Holidays.

**Imtiaz Mulla**



*A feedback like this always encourages us to do even better-*
*Team Girikand*

Singapore...continued from page 5

**Raffles Landing Site**

This spot along Boat Quay is where Singapore's Founder Sir Stamford Raffles is believed to have first stepped ashore and is marked by a statue made of pure white marble. The original figure stands outside Victoria concert hall and theatre Esplanade and was cast in dark bronze by Thomas Woolner.

**Merlion in the city** of Singapore is comparatively smaller than Merlion in the Sentosa. It's a most recognizable icon of Singapore and an emblem of Singapore tourism board. This half-fish- half lion creature's tail represents Singapore's early days as fishing village, while lions head relates to the 11th century legend of Sang Nila Utama, a Sumatran prince who named the island Singapura (lion city) after chancing upon a lion like creature here. The statue's current home at Merlion Park is a short walk from the Fullerton wine and dine complex, where you will find the famous buildings like Singtel Hitachi etc.

**Esplanade - Theatres on the Bay**

Opened in 2002 this is Singapore's premier performing arts centre and the place to go for world-class music, drama and dance or anything to do with the arts. **Orchid garden** is full of lush greenery. There are orchid flowers every where. It has baby orchids, VIP special orchids, orchid in mist house, orchids in wood house, and orchids in cool house. I confess to having really 'gone mad' in the orchid garden. The beautiful purple color orchid is Singapore's National flower.

**Chinatown**

No visit to Singapore would be complete without visit to this. The original site is where Chinese immigrants lived. Today Chinatown incorporates a part of the central business district. There are food shops and restaurants everywhere. I purchased some Chinese lamps there. China town is decorated very differently with red colored flower lamps and posters everywhere. We came back to the hotel at 8.00 pm, feeling exhausted and hungry. But Singapore is also Asia's food paradise and also a shopper's paradise. So, despite the exhaustion, we had our dinner and went shopping. I was really feeling a little sad when we started packing our baggage. We had to leave the hotel by 04.00 o'clock in the middle of the night on 09th of Sep. But I was not feeling like returning back to India from this magical and sweet city. We had actually covered many things, and discovered it in a different way. But we still feel that many things are yet to be discovered and rediscovered.

Singapore is truly a unique city like no other. It's a Golden midpoint. It has been a bridge between the east and the west for centuries with its friendly and welcoming people, state of art infrastructure and something new happening every day. Singapore is really a superb sensation and at the same time, a very calm and peaceful city. Singapore is a 'multi-cultural, multi-cuisine, multi-attractions' city. It is a city where every one likes to visit more than once. So, it really is a multi-visit city. A city that is easy to enjoy but really hard to forget.







नमस्कार मंडळी!
२०१७ सालचे कार्यकारिणीचे President पद स्वीकारतांना मला खूप आनंद झाला होता आणि म्हणता म्हणता हे वर्ष संपल सुद्धा. माझ्या बरोबर काम करायला उभे राहिलेले माझे सहचारी यांच्या सपोर्ट मुळे, काम करतांना खूप मजा आली. ह्या वर्षीच्या प्रत्येक कार्यक्रमाला तुम्ही भरगोस प्रतिसाद दिल्या बद्दल तुमचे मनापासून आभार.

मी व संदीप मराठी मंडळात गेले २२ वर्ष involved आहोत. आमची दोन्ही मुलं, उमा आणि कुणाल, मराठी मंडळाच्या सगळ्या कार्यक्रमांना येऊन मोट्ठी झाली. किती तरी वर्ष मला वाटायचे कि माझ्या मुलांना आमची extended फॅमिली, दिवाळीला केलेला सगळ्यांबरोबर फराळ, गप्पा, गणपतीच्या आरत्या, होळीची शेकोटी, हे सगळे मिस होत आहे म्हणून. एकदा त्यांच्या बरोबर उत्स्फूर्त संवाद सदतांना त्यांनी आपुलकीने मला विचारले "आई मराठी मंडळाचा कार्यक्रम कधी आहे?" तेव्हा माझ्या लक्ष्यात आले कि NEOMM हाच त्यांचा extended परिवार होता. आणि ज्या गोष्टी ही मुलं मिस करत आहेत असें मला वाटत होते, त्या सगळ्या गोष्टींचा अनुभव त्यांना NEOMM च्या कार्यक्रमातून मिळत होता. त्याच प्रकारे आमच्या मित्र मंडळीतल्या मुलांना पण हाच अनुभव येत होता ह्यात शंका नाही.

सांगायचा मुद्दा एवढाच कि NEOMM हे platform आपल्या सगळ्यांचे आहे. खास करून आपल्या मुलांना extended परिवार मिळविण्याचे ठिकाण म्हणून, अनेक वर्ष्यांच्या घट्ट मैत्री करण्या साठी म्हणून, आणि आपल्या मराठी संस्कृतीची ओळख करून घेण्यासाठी NEOMM आहे.

तेव्हा २०१७ ह्या वर्षात छान कलाकारांची अदाकारी व सण साजरे केलेच पण प्रत्येक कार्यक्रमात मुलांचा सहभाग राहील ह्याची मुख्यतः दखल घेतली. वेगळ्या वेगळ्या कार्यशाळा आयोजित केल्या. ह्यात आनंद मोरे, अनुजा मोरे ह्या दोघांचे विशेष कौतुक करावेसे वाटते कारण त्या दोघांनी खूप मेहेनत घेतली. त्यांच्या मेहेनती मुळे NEOMM च्या मराठी मुलांना एक छान संकृतीचा कलेतून अनुभव मिळाला. Thank you Anand and Anuja!

येणाऱ्या कार्यकारिणीला Best of Luck! See you all on the other side….
तुमचीच,

**तन्मयी दीक्षित**



***** दिवाळी च्या हार्दिक शुभेच्छा *****